# बृहन्मुंबई महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग

क्र. एमपीआर/1258 दि. 13.05.2025

**-सूचना पत्र-**

विषय : बृहन्मुंबई महानगरपालिकेतील 'कनिष्ठ लघुलेखक (इं-नि-म)' संवर्गाची प्रतिक्षायादी प्रसिध्द करण्याबाबत.

संदर्भ : क्र. एमपीआर/3130 दि.11.08.2023

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील 'कनिष्ठ लघुलेखक (इं-नि-म)'या संवर्गातील 226 रिक्त पदांकरीता, ऑनलाईन अर्ज मागवून, मे.आय.बी.पी.एस.(इंस्टिट्यूट ऑफ बॅकिंग पर्सोनेल सिलेक्शन) या संस्थेमार्फत, बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षा घेऊन भरण्यासाठी दि. 22.12.2023 रोजी घेण्यात आलेल्या परीक्षेच्या निकालानुसार, एकूण 445 उमेदवार विहित केलेल्या निकषानुसार उत्तीर्ण झाले. तसेच, क्र. एमबीसी/2357 दि.10.12.2014 सोबतच्या शासन निर्णय क्र. एसआरव्ही-1012/प्रक्र.16/12/16अ व क्र. एमबीसी/2610 दि.15.01.2019 सोबतच्या शासन निर्णय क्र. संकीर्ण-1118/प्रक्र.16-अ दि.19.12.2018 अन्वये शासन सेवेत सरळसेवा भरतीसाठी समांतर आरक्षण कार्यन्वीत करण्याबाबतच्या कार्यपध्दतीनुसार, उमेदवारांच्या सर्व मूळ शैक्षणिक प्रमाणपत्रे तसेच इतर आवश्यक प्रमाणपत्रांची / कागदपत्रांची पडताळणी करण्यात येऊन, निवडीच्या निकषानुसार, पात्र ठरलेल्या उमेदवारांची **अंतिम निवडयादी** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/For prospects/Recruitment या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे, क्र. एमपीआर/1167 दि.27.12.2022 सोबतच्या शासन निर्णय क्र. प्रानिमं 1222/प्र.क्र. 54/का.13-अ दि.04.05.2022 अन्वयेच्या निर्देशानुसार, मे.आय.बी.पी.एस.(इंस्टिट्यूट ऑफ बॅकिंग पर्सोनेल सिलेक्शन) या संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेमधील उर्वरित गुणवत्ताधारक उमेदवारांची सामाईक प्रतिक्षा यादी व प्रवर्गनिहाय प्रतिक्षा यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/For prospects/Recruitment या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

| सही/- दि. 13.05.2025 | सही/- दि. 13.05.2025 | सही/- दि. 13.05.2025 |
|---|---|---|
| प्रशासकीय अधिकारी (एमपीआर) | सह प्रमुख कर्मचारी अधिकारी (आस्थापना) | प्रमुख कर्मचारी अधिकारी |